# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर | वर्ष ३ रे | अंक २३३ वा | रविवार दि.१८ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठे ४ | स्वागत मूल्य २ रू.


# विकासरत्न विलासराव देशमुख यांच्या पूर्णाकृती पुतळयाचे आज अनावरण

लातूर : प्रतिनिधी पश्चीम महाराष्ट्राप्रमाणे मराठवाड्यातही साखर कारखानदारी यशस्वी ठरते नव्हे तर ती राज्य आणि देशासाठीही आदर्श बनू शकते हे सिध्द करुन या मागास विभागात आर्थिक क्रांती घडविणारे माजी मुख्यमंत्री माजी केंद्रीय मंत्री विकासरत्न विलासराव देशमुख यांचा त्यांच्याच प्रेरणेतून सुरु झालेल्या विलास साखर कारखान्यावर त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला आहे. या पुतळ्याचे अनावरण आणि विलास भवन या कारखान्याच्या प्रशासकीय इमारतीची शिलान्यास आज दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.१० वाजता होत आहे.लातूर जिल्ह्यात सहकार आणि साखर उद्योगाची उभारणी करणारे महान नेते, शेतक-यांचे कैवारी, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रिय मंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि कारखान्याच्या 'विलासभवन' या प्रशासकीय इमारतीचा शिलान्यास कार्यक्रम आपल्या सर्वांसाठी एक प्रेरणादायी क्षण असेल. माजी मुख्यमंत्री माजी केंद्रीय मंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांच्या कुशल नेतृत्वाखाली महाराष्ट्रालाही आदर्श घ्यायला लावणा-या सहकारी संस्था लातूर जिल्ह्यात उभ्या राहिल्याचे चित्र आज आपणाला पाहायला मिळत आहे. असे चित्र उभा करणारे माजी मुख्यमंत्री माजी केंद्रीय मंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांचे विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर, निवळी ता. जि. लातूर येथे उभारण्यात आलेल्या पुर्णाकृती पुतळाचे अनावरण आणि 'विलासभवन' कारखान्याच्या प्रशासकीय इमारतीचा शिलान्यास करण्यासाठी श्री. विलासराव देशमुख स्मृति सोहळा आज आयोजित करण्यात आला आहे.विकासरत्न विलासराव देशमुख स्मृती सोहळा कार्यक्रमाच्या निमंत्रक चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष सहकार महर्षी माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दिलीपराव देशमुख आहेत. महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या हस्ते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रिय मंत्री विकासरत्न विलासराव देशमुख यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि कारखान्याच्या 'विलासभवन' या प्रशासकीय इमारतीचा शिलान्यास कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमास माजी ऊर्जा मंत्री नितीन राऊत, माजी शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड, माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार, माजी महिला व बालविकास मंत्री श्रीमती यशोमती ठाकूर, माजी आदिवासी विकास मंत्री के. सी. पाडवी, माजी वस्त्रोद्योग मंत्री असलम शेख, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष चंद्रकांत हंडोरे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष मोहम्मद आरिफ नसीम खान, माजी गृह राज्यमंत्री सतेज पाटील, माजी सहकार व सामाजिक न्याय राज्यमंत्री विश्वजीत कदम, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी आमदार व कार्याध्यक्षा प्रणिती शिंदे, माजी परीवहन मंत्री मधुकरराव चव्हाण, माजी राज्यमंत्री बस्वराज पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी आमदार व कार्याध्यक्षा कुणाल पाटील, मुंबादेवी विधानसभा आमदार अमिन आमिरअली पटेल, पाथरी विधानसभा आमदार सुरेश वरपूडकर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी सरचिटणीस शैलेश पाटील चाकूरकर, सौ. सुवर्णाताई दिलीपराव देशमुख, टवेंटीवन ॲग्री लि. संचालिका सौ.अदिती अमित देशमुख, जागृती शुगर लि. चेअरमन सौ. गौरवी अतुल भोसले-देशमुख, लातूर ग्रामिणचे माजी आमदार वैजनाथराव शिंदे, लातूर ग्रामीणचे माजी आमदार त्र्यंबक भिसे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचीटणीस अशोकराव पाटील निलंगेकर, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष किरण जाधव, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती जगदीश बावणे, रेणा सहकारी साखर कारखाना चेअरमन सर्जेराव मोरे, संत शिरोमणी मारुती महाराज कारखान्याचे चेअरमन, शाम भोसले, उच्चतम कृषी उत्पन बाजार समिती, उपसभापती, सुनिल पडिले, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक व्हाईस चेअरमन प्रमोद जाधव, जागृती सुगर्स ॲण्ड अलाईड इन्डस्ट्रिज उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, ट्वेन्टीवन शुगर्स लि. उपाध्यक्ष विजय देशमुख, विलास को. ऑपरेटीव्ह बॅक ली. व्हाईस चेअरमन समद पटेल, रेणा सहकारी साखर कारखाना व्हा चेअरमन, अनंतराव देशमुख, संत शिरोमणी मारुती महाराज साखर कारखाना व्हाईस चेअरमन सचिन पाटील यांची उपस्थिती राहणार आहे.या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विलास कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे, कार्यकारी संचालक, यूनिट-१ संजीव रघुनाथ देसाई, कार्यकारी संचालक, युनिट-२ आत्माराम रामचंद्र पवार, संचालक सर्वश्री अनंत बारबोले, गोविंद बोराडे, अमर मोरे, गुरुनाथ गवळी, रामदास राऊत, रणजित पाटील, गोविंद डूरे, सुभाष माने, नारायण पाटील, बाळासाहेब बिडवे, भैरवनाथ सवासे, अमृत जाधव, संजय पाटील खंडापूरकर, भारत आदमाने, ज्ञानोबा पडिले, सूर्यकांत सुडे व समस्त विलास परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.





# संपादकीय....

## बहाणे आणि दुखणे

भारतीय राजकारणाला गेली अनेक दशके ग्रासून टाकणाऱ्या पक्षांतराच्या रोगाबाबत सर्वोच्च न्यायालयातून काही ठोस उपाय पुढे आला, तर लोकशाही अधिक सुदृढ पायावर उभी राहू शकेल.शिवसेनेतील फुटीनंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केलेला निवाडा, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गट हीच 'राष्ट्रवादी काँग्रेस' आहे, असा निवडणूक आयोगाने काढलेला निष्कर्ष, यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीबाबतचा नार्वेकर यांचा निकाल ही सगळी घटनांची साखळी प्राप्तकालाचा विचार करता अपेक्षित होती.शिवसेनेतील फुटीबाबत नार्वेकर यांनी निकाल देण्याआधीच निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांचा गट हीच 'मूळ शिवसेना' आहे, असा निवाडा करून टाकला होता. त्यामुळे नार्वेकर यांनी गुरुवारी 'राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांचीच!' असा जो काही फैसला केला, त्यात आश्चर्य वाटण्याजोगे काहीही नाही. शिवसेनेतील फुटीनंतर निवाडा करताना, नार्वेकर यांनी दोन्ही गटांतील सर्वच आमदारांना पात्र ठरवले होते. राष्ट्रवादी काँग्रेसबाबत निकाल देतानाही, त्यांनी सर्वांनाच 'पात्र' ठरविले आहे. त्यामुळेच शरद पवार गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी हा निकाल 'कॉपी पेस्ट' असल्याची रास्त प्रतिक्रिया दिली आहे. मात्र, यावेळी नार्वेकर यांनी आपल्या निवाड्याला देता येईल तेवढा वैधानिक आणि घटनात्मक नियमांचा मुलामा देण्याचा प्रयत्न केला आहे.पक्षाची घटना, रचना तसेच विधिमंडळातील संख्याबळ या त्रिसूत्रीच्या आधारावर आपण हा निकाल दिल्याचे नार्वेकर यांनी म्हटले आहे. विधिमंडळात शिवसेनेतील एकनाथ शिंदे गटाकडे दोन तृतीयांशाहून अधिक बहुमत होते आणि अजित पवार बाहेर पडले तेव्हा त्यांचे विधिमंडळातील संख्याबळ हे तेवढेच तुल्यबळ होते. हा नार्वेकर यांच्या निवाड्याचा मुख्य आधार आहे.मात्र, यामुळे विधिमंडळ वा संसद यांच्याबाहेर जनतेच्या मैदानात असलेल्या पक्षाला-संघटनेला काही अधिकार आहेत का नाहीत, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्याबाबत खरे तर सर्वोच्च न्यायालयाच्या पातळीवरच गांभीर्याने विचार व्हायला हवा; अन्यथा घटनेच्या दहाव्या परिशिष्टातील पक्षांतरबंदीच्या संबंधातील तरतुदी या यापुढे निरर्थक ठरू शकतात.राष्ट्रवादी काँग्रेसच्या मूळ कार्यकारिणीतील बहुतांश सदस्य हे शरद पवार यांना पाठिंबा देत असले, तरी त्यांच्या नेमणुका या पक्षाच्या घटनेला धरून झालेल्या नाहीत. त्यामुळे या पाठिंब्याचा विचार करता येणार नाही, असाही निष्कर्ष नार्वेकर यांनी काढला आहे. शिवाय, घटनेतील दहाव्या परिशिष्टाबाबतही त्यांनी काही भूमिका घेत आपला निर्णय दिला आहे. पक्षातील असंतोष आणि धोरणविषयक मतभेद यांच्यातून मार्ग काढण्यासाठी दहाव्या परिशिष्टातील तरतुदींचा वापर करणे अयोग्य असल्याची भूमिका विधानसभा अध्यक्षांनी घेतली असून, त्याच भूमिकेचा आधार घेत त्यांनी हा निवाडा दिला आहे. मात्र, अजित पवार यांनी घेतलेली भूमिका हे सरळ-सरळ पक्षनेतृत्वाला आव्हान होते.त्यातूनच ते आणि त्यांचे सहकारी यांनी मूळ राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या भूमिकेला छेद दिला होता. यास बंडच म्हणावे लागेल. मात्र, नेतृत्वविषयक स्पर्धेतून निर्माण झालेला असंतोष विधानसभा अध्यक्ष चिरडून टाकू शकत नाहीत; याचे कारण कोणत्याही पक्षातील अंतर्गत स्पर्धेत विधानसभा अध्यक्षांना भूमिका घेता येत नाही, असे भाष्य नार्वेकर यांनी केले आहे.मात्र, दहाव्या परिशिष्टातील पक्षांतरबंदीसंबंधीच्या तरतुदीत मूळ पक्षातून दोन तृतीयांश विधिमंडळ वा संसद सदस्य बाहेर पडल्यास, त्यांना अन्य कोणत्या तरी पक्षात सामील होण्याची अट आहे. त्याऐवजी शिवसेना तसेच राष्ट्रवादी काँग्रेसमधील नाराजवंतांनी बाहेर पडून आपला गट हाच मूळ पक्ष असल्याचा दावा केला. आता नार्वेकर यांच्या या दोन्ही प्रकरणांतील निवाड्यांमुळे त्या दाव्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.उद्धव ठाकरे गटाने नार्वेकर यांच्या निर्णयास सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे आणि शरद पवार गटही त्याच मार्गाने जाणार, अशी चिन्हे दिसत आहेत. तेव्हा सर्वोच्च न्यायालयात भारतीय राजकारणाला गेली अनेक दशके ग्रासून टाकणाऱ्या पक्षांतराच्या रोगाबाबत काही निश्चित निदान झाले तर आपली लोकशाही अधिक सुदृढ पायावर उभी राहू शकेल.आजच्या राजकारणात नवे प्रघात पडत आहेत आणि त्यातूनच नवनव्या आघाड्या तयार होत आहेत. यामध्ये पक्षाची मूळ विचारधारा आणि भूमिका यांना हरताळ फासला जाताना दिसत आहे.'हे आजच्या राजकारणाचे वास्तव असून, अशा प्रकारच्या प्रत्येक कृतीस 'पक्षांतर' म्हणता येणार नाही,' असे नार्वेकर यांनी निकालात म्हटले आहे. त्यामुळेच त्यांचे हे दोन निवाडेही नवीन प्रघात पाडणारेच आहेत, असे देखील कोणी म्हणू शकेल.अर्थात, प्रत्यक्षात जनतेच्या दरबारात मूळ पक्ष कोणता याचा फैसला होणार, हे उघड आहे. शरद पवार तसेच उद्धव ठाकरे यांना त्यामुळेच पुढच्या निवडणुकीपर्यंत वाट बघावी लागणार, हाच नार्वेकर यांच्या या दोन्ही निकालांचा मथितार्थ आहे.

# बंदी कसली कोचिंग क्लासेसना 'स्टार्टअप' दर्जा द्या

मागील महिन्यात केंद्र शासनाने कोचिंग क्लासेस व्यवसायासाठी नियमावली तयार करण्यासंदर्भात राज्यांना काही मार्गदर्शक सूचना दिल्या. त्यामध्ये १६ वर्षांखालील विद्यार्थ्यांसाठी कोचिंग क्लासेस असू नयेत, अशी महत्त्वपूर्ण सूचना केंद्र शासनाने राज्यांना केलेली आहे. मुळात कोट्यवधी रुपयांचे बजेट असलेली शासनाची शिक्षण व्यवस्था अस्तित्वात असताना कोचिंग क्लासेसची गरजच का पडावी याचा विचार सर्वप्रथम करणे गरजेचे आहे. याला कारणीभूत आहे शासनाची शैक्षणिक व्यवस्था, ज्यामध्ये विद्यार्थ्यांचे व पालकांचे समाधान होत नाही, तर दुसरीकडे वाढलेली जिवघेणी शैक्षणिक स्पर्धा व पालकांच्या अतिमहत्त्वाकांक्षा.३०-४० वर्षांपूर्वी अभ्यासात कमकुवत असलेले १० टक्के विद्यार्थी कोचिंग क्लास लावायचे. आता शासनाच्या शिक्षण व्यवस्थेत ९० टक्के विद्यार्थी कमकुवत असतात आणि म्हणून ते कोचिंग क्लासला जातात. कोचिंग क्लासेस चालवणारे शिक्षक सुशिक्षित आहेत, परंतु त्यांच्या हाताला काम नसल्यामुळे ते बेरोजगार आहेत, त्यामुळे ते इमानी इतबारे सकाळी सहापासून व्यावसायिक भूमिकेतून कोचिंग क्लासेस चालवतात. खासगी व्यवसाय असल्यामुळे व्यवसायवाढीसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा ते स्वत:च उभ्या करतात. जो तो आपल्या कुवतीप्रमाणे जाहिरात तंत्राचा वापर करून आपला व्यवसाय वाढवण्याचा प्रयत्न करतो. खासगी कोचिंग क्लासेस संचालकांच्या सचोटीमुळे आणि त्यांच्या कौशल्यांमुळे पालक त्यांच्याकडे आकृष्ट होतात व आपल्या पाल्यासाठी स्वेच्छेने खर्च करतात.स्वयंरोजगार हवा की नको?सुरुवातीला साधारणपणे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून एक शिक्षकी कोचिंग क्लास सुरू होतो. पुढे त्या क्लासचा नावलौकिक होतो व विद्यार्थीसंख्या वाढते. अनेक शिक्षकांना यातून रोजगार मिळतो. अनेक गृहिणी शिकवणी व्यवसायातून आपल्या कुटुंबाला हातभार लावतात. शासन एकीकडे स्वयंरोजगाराचा डांगोरा पिटते आणि दुसरीकडे कोचिंग क्लासेस संचालकांनी स्वतःच्या भरवशावर नावरूपास आणलेला व्यवसाय बंद करण्याचा विचार करते, हा कुठला न्याय? शासन स्तरावर कोचिंग क्लासेसची सकारात्मक बाजू केव्हा लक्षात घेतली जाईल? स्टार्टअपची प्रतिष्ठा केव्हा मिळेल विद्यार्थ्यांच्या शाळांच्या वेळा सांभाळून सकाळी ६ पासून कोचिंग क्लासेसचा संचालक अभ्यासक्रम, चाचणीच्या वेळा, टेस्ट पेपर, विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवणे, पालक सभा आयोजित करणे यासारख्या शाळेला समांतर असलेल्या अनेक गोष्टी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो. अनेक आव्हानांना तोंड देत कोचिंग क्लासेस संचालक आपल्या व्यवसायाचा दर्जा उत्तम टिकवण्यासाठी प्रयत्न करतो, जर त्यांनी नावलौकिक मिळवला नाही तर त्यांच्याकडे कुठलाही पालक आपल्या पाल्याला पाठवणार नाही ही वस्तुस्थिती आहे. 'हाडाचा शिक्षक' ही संकल्पना कोचिंग क्लासेसमध्ये पाहायला मिळेल. पण नेमके शासनाचे या सर्व सकारात्मक बाबींकडे दुर्लक्ष होते व ज्या काही नकारात्मक बाबी आहे त्याच शासनाच्या व समाजाच्या लक्षात राहतात. देशात नवनवीन कंपन्यांच्या स्टार्टअपना शासन प्रोत्साहन देते, मग कोचिंग क्लासेसच्या व्यवसायाला स्टार्टअपची प्रतिष्ठा केव्हा मिळेल किंवा ती प्रतिष्ठा का मिळू नये, याचाही विचार व्हायला हवा. शाळेतील शिक्षकांना निवडणुकीची कामे, अनेक प्रकारची सर्वेक्षणे, खिचडी शिजवणे अशी अनेक कामे करावी लागतात, परंतु कोचिंग क्लासचा शिक्षक केवळ शिकवण्याच्याच कामावर लक्ष केंद्रित करतो. शाळेचा एक 'तास' (पिरियड) ३० मिनिटांचा असतो. कोचिंग क्लासचा एक 'तास' एका तासाचा असतो.पुरस्कार ना प्रतिष्ठा कोचिंग क्लासेसचे शिक्षकसुद्धा शाळेत आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता ग्रहण करून ३०-३५ वर्षे कोचिंग क्लासेस व्यवसायात असतात. तरीही त्यांच्या नशिबी कोणताही आदर्श शिक्षक पुरस्कार येत नाही. अनेक कोचिंग क्लासेस संचालकांची पात्रता व अनुभव अभ्यास मंडळावर काम करण्याएवढा असतो, परंतु तो शासनाचा सावत्र पुत्र असल्याप्रमाणे त्याला कधीही विचारले जात नाही. लोकशाही प्रक्रियेत शिक्षक मतदार संघामध्ये त्याचे जर मतदान असेल तर कोचिंग क्लासेस व्यवसायिकाचा निवडणूक प्रक्रियेमध्ये दबाव गट तयार होईल, परंतु त्याला मतदार म्हणून सुद्धा हक्क दिला जात नाही. शासनाने एकीकडे कोचिंग क्लासेसला एमएसएमई मध्ये समाविष्ट करून लघु उद्योगाचा दर्जा दिला आहे व त्याला १८ टक्के हा वरचा जीएसटीचा स्लॅब लावलेला आहे तर दुसरीकडे शासन कोचिंग क्लासेसची तुलना चॅरिटी तर्फे चालवल्या जाणाऱ्या व त्या सर्व सवलती घेणाऱ्या शाळेशी करते, हा कोणता न्याय?अनिष्ट प्रथा कोणत्या व्यवसायात नाहीत? इतर कुठल्याही व्यवसायाप्रमाणेच जर कोचिंग क्लास व्यवसायातही काही अनिष्ट गोष्टी घडत असतील, तर त्यावर नियंत्रण आणणे अशक्य नाही. गोव्या सारख्या लहान राज्याने २५ वर्षांपूर्वीच २००१ ला कोचिंग क्लासेस व्यवसायिकांसाठी नियमावली आणली, त्यानंतर यूपी, कर्नाटक, बिहार, मणिपूर व अलीकडे राजस्थानने सुद्धा कोचिंग क्लासेस व्यवसायिकांसाठी नियमावली आणली. जाचक अटी वगळून लाखो सुशिक्षित लोकांचा उदरनिर्वाहाचा व्यवसायच बंद करणे हा काही उपाय होऊ शकत नाही. पायाला जखम झाल्यानंतर पाय तोडून फेकला जात नाही, तर जखमेवर उपचार केले जातात.कोचिंग क्लास लावणे ही काही आज फक्त कोचिंग क्लास व्यवसायिकांचीच नव्हे तर विद्यार्थ्यांची व पालकांचीही गरज झाली आहे. सोळाव्या वर्षापर्यंतच विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया भक्कम करण्याचे काम शाळेबरोबरच कोचिंग क्लासेससुद्धा करत आहेत. आणि याच वयासाठीच्या कोचिंग व्यवस्थेवर जर शासन बंदी आणत असेल तर पुढील पिढीची शैक्षणिक गुणवत्ता काय असेल व समाजाचे किती मोठे नुकसान यामुळे होईल, याचा विचार नक्कीच शासनकर्त्यांनी करणे आवश्यक आहे. कोचिंग क्लासेसच्या व्यवसायिकांबरोबरच विद्यार्थी व पालकांसाठी केंद्र व राज्य शासनाने पालकत्वाच्या भूमिकेतून वागण्याची आज गरज आहे एवढेच सुचवावेसे वाटते.




# भ्रष्टाचारी सत्तेवर कष्टकरी रस्त्यावर

सध्या देशामधील राजकारण किती निच पातळीवर पोहचले आहे याची जाणीव खेड्यातील लहान मुलांनाही झाली आहे. मजबूत लोकशाही साठी निरपेक्ष व सक्षम राजकारण आणि मजबूत विरोधी पक्ष आवश्यक असतात. सरकारच्या ध्येयधोरणा बाबत जनतेचे मत सरकार दरबारी मांडून जनतेचा आवाज बुलंद करण्याचे काम मीडिया करत असतो. परंतु देशातील राजकारण बघितले तर हजारो करोडोचे भ्रष्टाचार केलेले, ईडीच्या चौकशी मध्ये अडकलेले जेव्हा भाजपा मध्ये सामील होतात तेव्हा त्यांना भ्रष्टाचारी बोलनेही गुन्हा ठरतो. मिडियाने भाजपा मध्ये प्रवेश करून भाजपाचे प्रवक्ते म्हणून आपली जबाबदारी अगदी लाचार होऊन स्वाभिमान ईमान गहाण ठेवून सर्वोत्कृष्ट चाटुगीरी करून पाडत आहेत. हजारो करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करून देशाला देशातील जनतेला चुना लावणारे नेते तुरुंगात पाहिजे होते भाजपा मध्ये जात आहेत. देशाला जनतेला लुटणारे भ्रष्टाचारी केवळ भाजप मध्ये प्रवेश घेऊन भाजपचे कामच करत नाहीत तर याच भ्रष्ट लोकांना संसदेमध्ये, विधानसभेमध्ये, विधानपरिषदेमध्ये पाठवून अजून जास्तीची जबाबदारी देऊन भ्रष्टाचारातुन मुक्त होण्यासाठी संधी देत आहेत. एवढे मानवतावादी काम सध्या सुरू आहे. सरकारला प्रश्न विचारणारा, भ्रष्टाचारी नेत्यांना भ्रष्ट म्हणणारा आज धर्म विरोधी होत आहे. तो देशद्रोही होत आहे. भाजपा मधील अपवाद वगळता राजकीय नेत्यांवर इडीची धाड पडत नाही. जेथे इडीची धाड पडली तेथे भाजपा नेत्यांकडे करोडो रुपये सापडले हे कोणीही नाकारू शकत नाही. भाजपा एवढा प्रामाणिक पक्ष आहे की देशातील संपूर्ण भ्रष्टाचार कमी करण्यासाठी इडीच्या माध्यमातून भ्रष्टनेत्यांच्या घरी धाडी टाकल्या जातात. नंतर कारवाई टाळण्यासाठी त्यांना भाजपा मध्ये प्रवेश करावा लागतो. एकदा भाजपा मध्ये प्रवेश झाला की त्यांना सर्वोत्कृष्ट प्रामाणिक पणाचे प्रमाणपत्र दिले जाते. याच भाजपच्या मोहीमीमुळे देशातील सर्व भ्रष्टाचारी नेते हळूहळू भाजपात जाऊन स्वतः चे शुद्धीकरण करून देशप्रेम सिद्ध करत आहेत. लोकशाही साठी सर्वात महत्त्वाचा असतो तो विरोधी पक्ष. सक्षम लोकशाही मध्ये संसदेत सत्ताधारी व विरोधक यांच्या एखाद्या बिलावर चर्चा होऊन ते पास केले जाते. परंतु भाजपा एवढा मजबूत पक्ष आहे की विरोधी पक्षातील बरेचशे नेते आपल्या कडे घेऊन उर्वरित खासदारांचे निलंबन करून अनेक लोकहिताच्या विरोधी कायदे तयार कोणत्याही चर्चेशिवाय बिल पास करून घेतले जाते. जनतेचे व देशाचे वाटोळे करायला निघालेले सर्व भ्रष्टाचारी जमाव पार्टी भाजपा होय. राजकारण हे देशातील जनतेच्या कल्याणाचे असायला पाहिजे परंतु ते भ्रष्टलोकांच्या उद्धारासाठी होत आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, महागाई, मुलभूत सुविधा व हक्क अधिकार यावर राजकारण करणे आवश्यक असताना आज राजकारण कुठे नेऊन ठेवले हे फक्त जागृत माणसेच समजू शकतात. राजकारणाला धर्माचे वलय देऊन धर्माला बदनाम आणि धार्मिक लोकांना गुलाम बनवण्याचे काम सुरू आहे. आणि याच गुलाम लोकांच्या, भक्ताच्या माध्यमातून सामाजिक, जातीय व धार्मिक तेढ निर्माण करण्याचे काम केले जात नाहे. भ्रष्टलोकांना खुर्चीवर बसवून मान सन्मान व पुन्हा देशाला व जनतेला लुटण्याची संधी दिली जात आहे. भ्रष्ट लोकांना दिल्लीच्या खुर्चीवर बसवले जात आहे. परंतु रात्रंदिवस कष्ट करणाऱ्या जनतेला दिल्ली च्या रस्त्यावर संविधानीक पद्धतीने येऊ दिले जात नाही. भ्रष्ट लोकांना न मागता पैसा, पद दिले जाते परंतु जनता शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा, मुलभूत सुविधा मागते तर त्यांना मज्ज्ञाव केला जातो. लोकशाही चे गोडवे गाण्याचे नाटक करणारे भाजपा सर्वसामान्य जनतेच्या मुलभूत हक्काचे उल्लंघन करत आहे. हेच आहेत का अच्छे दिन? शेतकरी स्वतः मागण्या घेऊन संविधानीक पद्धतीने आंदोलन करत आहेत तर शेतकऱ्यांनी दिल्लीमध्ये येऊ नये म्हणजे दिल्लीला छावनीचे स्वरूप दिले गेले. जागो जागी पोलीस तैनात करून शेतकऱ्यांना अडवले जात आहे. शेतकरी दिल्लीमध्ये येऊन नाही, त्यांचे वाहने दिल्लीत येऊच नाही म्हणून मोठ मोठे आणि मजबूत खिळे सिमेंट मध्ये लाऊन शेतकऱ्यांना अडवले जात आहे. शेतकऱ्यांचे ट्रक्टर येऊ नये म्हणून टोकदार खिळे लाऊन लाखो शेतकऱ्यांच्या जिवाशी व संविधानीक हक्क अधिकाराशी खेळले जात आहे. कष्टकरी शेतकऱ्यांना दिल्लीमध्ये जाऊन आपले मतही मांडण्याचा अधिकार नाही तर भ्रष्ट लोकांना दिल्लीच्या खुर्चीवर बसण्याचा अधिकार आहे का? हा प्रश्न जागृत असलेल्या प्रत्येक मानसाला पडलेला आहे. कष्टकरी जनतेला अडवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे नियोजन केले आहे. खिळे, बँरिगेट्स, तारांचे कुंपण, अश्रुधार, पोलीस पोर्स अजून बरेच काही सर्वसामान्य शेतकरी कष्टकरी लोकांनी रस्त्यावर येऊन संविधानीक मार्गाने कोणी बोलुही नाही म्हणून एवढे केले जात आहे. परंतु देशातील हजारो करोडो रुपये लुटून विजय माल्या, निरव मोदी, मेहुल चौक्सी सारखे किती तरी देशाला चुना लाऊन पळून गेले यांना अडवण्यासाठी सरकारला नवीन असे काहीच करायचे काम नव्हते. विमानतळावरून पकडून सरळ तुरुंगात टाकायचे होते. नवीन सुरक्षा तयार करण्याची, त्यांना पकडण्यासाठी जास्तीचा पैसा खर्च करण्याची गरजच नव्हती. सर्व व्यवस्था अगोदरच प्रत्येक विमानतळावर असते. प्रत्येक जनाची चौकशी करूनच व ओळख पटवून च सोडले जाते. मग देशाला चुना लावणारे देश सोडून पळून जाऊ शकतात परंतु देशासोबत प्रामाणिक राहुन, देशाला जगवणाऱ्या शेतकऱ्यांना दिल्लीत जाऊ दिले नाही म्हणजे येथे लोकशाही अस्तित्वात आहे कुठे हेच कळत नाही. शेतकऱ्यांना कष्टकऱ्यांना अडवण्यासाठी लाखो करोडो रुपये खर्च करून खिळे, सिमेंट, तार, बँरिगेट्स, अतिरिक्त पोलीस यावर खर्च केल्या पेक्षा लोकांच्या कल्याणासाठी योजना तयार करून त्याची योग्य ती अंमलबजावणी केली तर सर्व सामान्य लोक रस्त्यावर उतरतील च कशाला? सर्वसामान्य लोकांना पाहिजे तरी काय? शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा आणि संविधानीक हक्क अधिकाराचे संरक्षण मिळाले तरीही सर्व सामान्य व्यक्ती समाधानी होतो आणि देशातील समस्या आटोक्यात येतात. नेत्यांचे भ्रष्टाचार बघितले तर डोकं चक्राऊन जाते. भ्रष्टाचाराची रक्कम समजण्या पलीकडे असते. एका नेत्याच्या भ्रष्टाचार लाखों तरुणांच्या हाताला रोजगार मिळवून त्यांच्या आयुष्यात सुख समाधान देऊन भरभराट करू शकते. लाखों तरुणांचे भविष्य उद्धस्त करून स्वतः चे पोट भरणारे भ्रष्ट नेते कोणत्या पातळीवर श्रेष्ठ ठरणार आहेत. आपल्या संस्कारानुसार घासातील घास गरजु लोकांना दिले तर तेच चांगले कर्म आहे. पण हे भ्रष्टाचार करणारे एक एक नेता लाखों तरुणांच्या तोंडचा घास पळवतात, जगाला पोसणाऱ्या शेतकऱ्यांना उपाशी मारतात हे संस्कार नेमके आहेत कोणाचे? आमदार खासदार कोणत्याही पक्षाचा असो कोणत्याही मतदार संघातील असो त्याचे महिलांच्या बाबतीत वर्तन कसे आहे हे त्या मतदारसंघात बऱ्याच लोकांना माहिती असते. आमदार खासदाराची संपती किती वाढली हे मतदारसंघात सर्वांना माहिती असते. एकदा आमदार खासदार झाले कि पिढ्यानपिढ्यांची कमाई होते. परंतु पिढ्यानपिढ्या कष्ट करणाऱ्या लोकांची एका पिढीची कमाई होत नाही याचे नेमके काय कारण असेल? याचे उत्तर सर्वांना माहिती आहे. आमदार खासदार हा आपापल्या मतदारसंघाचा व मंत्री हे संपूर्ण राज्याचे पालनपोषण कर्ते असतात. परंतू आपापल्या मतदारसंघात आमदार खासदार जनतेचे किती कामे करून जनतेची कशी काळजी घेतात हे नव्याने सांगण्याची गरज नाही. कारण विकासकामाच्या नावाखाली झालेले उद्घाटन तर खुप बघायला मिळतात परंतू विकास कामाचे टेंडर, तेथे लागणाऱ्या मशनरी, कामासाठी लागणारे साहित्य हे कोण पुरवते किंवा ते लोक कोण असतात हे मतदार संघातील कोणीही सांगु शकते. जनतेचे तारणहार असलेले आमदार खासदार विकास कामाचा निधी फिरून आपल्याकडेच कसा येईल याकडे संपूर्ण लक्ष असते. कोणत्या कामात कशी टक्केवारी मिळवली जाते हे सर्वांना माहीत असलेले गुपीत आहे. आमदार खासदार यांनी मतदारसंघात जनतेच्या नावाचा सर्व पैसा लाटला तरी, काही योजना स्वकीयांनाच वाटल्या तरीही, नोकरीचे आमीष दाखवून सर्व सामान्य लोकांकडून पैसा उकळलि तरीही, स्वतः च्या बँक, हॉटेल, किंवा इतर आस्थापनेवर गोरगरीब लोकांची मुल मोल मजुरी साठी लावले आणि त्यांना योग्य पगार नाही दिला तरीही आमदार खासदार यांच्या विरोधात बोलने म्हणजे खुप मोठा अपराध ठरतो. परंतु आमदार खासदांनी संपुष्टात मतदार संघाला ठगुन लुटले तरीही तो अपराध होत नसेल तर हे संस्कार नेमके आहेत कोणाचे? देश सेवा, जनसेवेच्या नावाखाली वर्षानुवर्षे एकाच घरात राजकारण करून जाती धर्माचा आधार घेऊन स्वतः व स्वतः चे नातेवाईक राजकारण सक्रीय करून जनतेची लुट केली जात आहे आणि त्याला नाव जनसेवा दिले जात आहे. कोणत्याही मतदारसंघात मोजकेच लोक सोडले, जे ऑफिस भोवती फिरतात, जे भाऊ भाऊ म्हणून मिरवतात त्यांनाच आमदार खासदार आपले वाटतात. सर्व सामान्य जनतेचे काय? देशात किती आमदार खासदार असे असतील की जनतेत जाऊन जनतेच्या समस्या समजून घेऊन सोडवत असतील व मतदारसंघात आलेला निधी जनतेसमोर ठेवून हिशोब देत असतील. मतदारसंघात आलेल्या निधीचा मालक जनता असता. लोकप्रतिनिधी मार्फत फक्त तो आलेला असतो. जनतेचा आलेला निधी हडप करणारा कोणत्या दृष्टीने श्रेष्ठ असु शकतो. थोड्याफार पैशासाठी, जागेसाठी भाऊ भावाचा वैरी होतो. मग लाखो करोडो रुपये जनतेच्या मालकीचे लुटून स्वतः चे मोठमोठे घरे, गाड्या, शेती, हॉटेल, कारखाने होतात खरचं आमदार खासदार यांचे पगार किती ही वाढले तरीही एवढे प्रामाणिकपणे करणे शक्य होते का? आचरण व नितीमत्ता भ्रष्ट असणारे लोक सत्तेत बसवले जातात. प्रामाणिक लोक निवडून येऊ नाही म्हणून इव्हिएमचा आधार घेतला जातो. जनतेच्या मताला शुन्य किंमत, जनतेच्या कष्टाला शुन्य किंमत. इव्हिएमच्या माध्यमातून लोक निवडून येत आहे म्हणून इव्हीएम नको असे जनताच म्हणत आहे. जर इव्हीएम मध्ये गडबडी न करता कामाच्या जोरावर उमेदवार निवडून येत असतील तर छातीठोकपणे भाजपाचा एक तरी आमदार खासदार बँलेटपेपरवर निवडणूक लढण्याची हिंमत करेल का? इव्हीएम च्या माध्यमातून निर्माण झालेले सरकार जनतेला व देशाला कंगाल करून आमदार खासदार यांना मालामाल करत आहे. आमदार खासदार यांचा भ्रष्टाचार थांबण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध करण्यात येत नाही. पण कष्टकरी जनता जेव्हा न्याय हक्कासाठी रस्त्यावर येते तेव्हा मात्र त्यांना प्रतिबंध करण्याच्या नावाखाली जिवाशी खेळले जाते. लोकशाही मध्ये भ्रष्ट नेते सत्तेवर आणि जनता रस्त्यावर असेल तर लोकशाही साठी धोक्याची घंटा आहे. हे समजून जनतेचे उमेदवार निवडून येण्यासाठी इव्हीएम ला प्रतिबंध करणे आवश्यक आहे. तरच जनतेचे हक्क अधिकार सुरक्षित राहुन जनतेला रस्त्यावर यावे लागणार नाही.

**********

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**


# आपल्या शरीरासाठी २० मिनिटे सूर्यप्रकाश घेणे का गरजेचे आहे? वाचा, तज्ज्ञ काय सांगतात



दररोजच्या धावपळीच्या आयुष्यात आपण अनेकदा आपल्या आरोग्याकडे लक्ष देत नाही. पोषक आहाराची कमतरता, अपुरी झोप व चुकीची जीवनशैली यामुळे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होतात. अशात आपल्या शरीराला आवश्यक जीवनसत्त्वे मिळणे खूप महत्त्वाचे आहे. तज्ज्ञांच्या मते, २० मिनिटे सूर्यप्रकाश घेणे आपल्या आरोग्यासाठी चांगले असते. त्याविषयी जनरल फिजिशियन व न्युट्रिशन प्रशिक्षक डॉ. निर्मला राजगोपालन सांगतात, त्वचेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान न होऊ देता आणि त्वचेच्या कर्करोगाचा धोका न वाढविता, तुम्ही २० मिनिटे सूर्यप्रकाश घेऊ शकता. जर काही लोक जास्त काळ सूर्यप्रकाशाच्या संपर्कात येत असतील, तर त्यांना त्वचेच्या संरक्षणासाठी सनस्क्रीन वापरण्याचा सल्ला दिला जातो.तज्ज्ञांच्या मते, व्हिटॅमिन डी देणारा सूर्यप्रकाश चांगली झोप, चांगली त्वचा आणि स्नायू, उत्तम रोगप्रतिकारशक्ती, निरोगी आतडे व मूड सुधारण्यास मदत करते.दररोज किती प्रमाणात किती सूर्यप्रकाश घ्यावा हे व्यक्तीच्या त्वचेचा प्रकार, भौगोलिक ठिकाण आणि एकूणच व्यक्तीच्या आरोग्यावर अवलंबून असते.गुरुग्राम येथील मेरेंगो आशिया हॉस्पिटलचे वरिष्ठ सल्लागार डॉ. एम. के. सिंह सांगतात, दिवसातून १० ते ३० मिनिटे सूर्यप्रकाश घेतला तरी मोठ्या प्रमाणात आपल्याला व्हिटॅमिन डी मिळू शकते. हाडांच्या आरोग्यासाठी आणि चांगल्या रोगप्रतिकार शक्तीसाठी व्हिटॅमिन डीची गरज भासते. आपल्याला हे लक्षात घेण्याची गरज आहे की, ज्या ठिकाणी दररोज १२ तास सूर्यप्रकाश मिळतो, अशा ठिकाणी राहणाऱ्या लोकांनी २० मिनिटे सूर्यप्रकाश घ्यावा. ज्यांच्या त्वचेचा रंग डार्क म्हणजे काळसर असतो त्यांना दिवसातून ३० मिनिटे सूर्यप्रकाश घेण्याची गरज असते. काळसर त्वचा असणाऱ्या लोकांच्या शरीरात त्वचेचा रंग धारण करणारे मेलॅनिन नावाचे एक रंगद्रव्य अधिक प्रमाणात असते ज्यामुळे त्वचा सूर्यप्रकाश शोषून घेण्यास वेळ घेते, डॉ. राजगोपालन सांगतात.डॉ. निर्मला राजगोपालन पुढे सांगतात, जे लोक थंड प्रदेशात राहतात, त्यांना सूर्यप्रकाशाची जास्त आवश्यकता असते. अशा लोकांनी ड जीवनसत्त्व मिळविण्यासाठी दररोज दोन तास सूर्यप्रकाशात राहणे आवश्यक आहे. सदृढ जीवनशैलीसाठी सूर्यप्रकाश आवश्यक आहे. झोप आणि आतड्यांच्या आरोग्याचा थेट संबंध आहे. जर चांगली झोप झाली असेल, तर आतड्यांचे आरोग्यसुद्धा चांगले राहते. आतड्यांच्या आरोग्याचा थेट परिणाम आपल्या रोगप्रतिकार शक्ती आणि मूडवर होतो, असे डॉ. राजगोपालन सांगतात.डॉ. एम. के. सिंह सांगतात, खूप जास्त वेळ सूर्यप्रकाशात राहिल्यामुळे त्वचेशी संबंधित आजार किंवा त्वचेचा कर्करोग होण्याचा धोका वाढतो. त्या पुढे सांगतात, सूर्यप्रकाश घेताना योग्य समतोल राखणे गरजेचे आहे. सूर्यप्रकाश घेताना त्वचेच्या संरक्षणासाठी नीट कपडे घातले आणि त्वचेवर सनस्क्रीन वापरले, तर सूर्यप्रकाशाचे फायदे मिळू शकतात. तज्ज्ञांचा सल्ला घेऊन तुम्ही तुमच्या शरीरासाठी किती सूर्यप्रकाश आवश्यक आहे, हे जाणून घेऊ शकता.

# 'डायलेसिस'च्या रुग्णांसाठी 'किडनी गार्ड' ठरणार वरदान; पेटंट आणि डीएसटीचे मिळाले अनुदान

नागपूर : किडनी फेल झाल्यानंतर रुग्णावर 'डायलेसिस'चा उपचार करण्यात येतो. तो करताना अनेकदा डायलेसिस अयशस्वी होण्याची शक्यता असते. मात्र, अभियांत्रिकीच्या एका प्राध्यापकाने ती उपचार पद्धती अयशस्वी होऊ नये यासाठी 'किडनी गार्ड' तयार केले आहे. त्यामुळे आता डायलेसिस करताना ही उपचार पद्धती प्रभावी ठरणार आहे.विविध कारणांनी किडनी खराब होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यावर डायलेसिस हाच एकमेव पर्याय आहे. मात्र, अनेकदा ही उपचार पद्धतीही अयशस्वी होते. अशावेळी रुग्णाचा जीव जाण्याची शक्यता अधिक असते.हा धोका टाळण्यासाठी नागपूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागाचे साहाय्यक प्राध्यापक अभिजित राऊत यांनी 'किडनी गार्ड'ची संकल्पना मांडली. आपल्या आचार्य पदवीसाठी विश्वेश्वरैय्या राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्थेचे संचालक डॉ. प्रमोद पडोळे आणि प्रा. डॉ. रश्मी उद्दनवाडीकर यांच्या मार्गदर्शनात त्यांनी संशोधन सुरू केले. बायोमेडिकल प्रकल्प असल्याने त्यासाठी त्यांना किडनीरोग तज्ज्ञ डॉ. धनंजय उखळकर आणि प्लास्टिक सर्जन डॉ. पवन शहाणे यांची मदत घेतली. त्यांच्या मदतीने किडनी गार्ड तयार केले.डायलेसिस करताना हातातील रक्तवाहिनीचा फ्लो वाढविण्यासाठी आणि तो कायम टिकवून ठेवण्यासाठी त्याचा उपयोग करण्यात येणे शक्य आहे. त्यामुळे डायलेसिस यशस्वी होण्यासाठी ते सहायक सिद्ध होणार आहे. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून (डीएसटी) प्रा. अभिजित राऊत यांना अनुदान मिळाले असून त्यातून ते कार्य करीत आहे. विशेष



म्हणजे, त्यांनी या प्रकल्पासाठी पेटंटही त्यांनी मिळविले आहे.असा पडेल प्रभाव किडनी गार्ड' चे यश हे आरोग्यसेवेतील 'इनोवेटिव्ह इम्प्लांट्स' आणि नवनवीन संशोधनाबद्दलची संकल्पना आहे. या क्रांतिकारी इम्प्लांटमध्ये हिमोडायलिसिसच्या रुग्णांच्या जीवनात बदल घडवून आणण्याची क्षमता असून ज्यामुळे त्या संबंधित गुंतागुंतीचे उपचार सुलभतेने होण्यास मदत होईल.'निमल ट्रायल्स'सुरू 'किडनी गार्ड'हे अतिशय महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान असून त्यासाठी पशुवैद्यकीय महाविद्यालयात डॉ. शिरीष उपाध्याय, डॉ. आखरे, डॉ. गौरी फिसके आणि डॉ. भदाने यांच्या मार्गदर्शनाखाली 'निमल ट्रायल्स'सुरू करण्यात आलेली आहे.आचार्य पदवी मिळविताना काही तरी नवे करण्याची इच्छा मनात होती. त्यातून किडनी रुग्णांची समस्या सोडविण्यासाठी हा प्रकल्प हाती घेतला आणि 'किडनी गार्ड'तयार केले. यामुळे किडनीच्या रुग्णांना खरोखरच फायदा होणार. त्यासाठी प्राचार्य डॉ. अमोल देशमुख यांची मदतही मोलाची ठरली.

# रक्तदाब राहील नियंत्रणात, फक्त रिकाम्या पोटी करा 'हे' घरगुती उपाय..


रक्तदाब राहील नियंत्रणात, फक्त रिकाम्या पोटी करा 'हे' घरगुती उपाय..उच्च रक्तदाबाची समस्या आजकाल खूप सामान्य झाली आहे. उच्च रक्तदाबाची समस्या आजकाल खूप सामान्य झाली आहे. यामुळे स्ट्रोक आणि हृदयविकाराचा झटका देखील येऊ शकतो. मात्र, योग्य आहार आणि निरोगी जीवनशैलीने हा आजार नियंत्रणात ठेवता येतो. जेव्हा उच्च रक्तदाबाच्या रुग्णांचा बीपी वाढतो, तेव्हा रुग्णाला तीव्र डोकेदुखी, छातीत दुखणे, धाप लागणे आणि त्वचेवर लाल पुरळ यांसारखी लक्षणे दिसू लागतात.जर तुम्ही बीपी नियंत्रित करण्यासाठी औषधे घेत असाल तर तुम्ही तुमच्या आहारात काही आरोग्यदायी गोष्टींचाही समावेश करू शकता.



आज आम्ही तुम्हाला उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी एका सोप्या आणि प्रभावी पेयाबद्दल सांगणार आहोत.लागणारे साहित्य धणे – ५ ग्रॅम छोटी वेलची– १ हळद पावडर – १ चिमूटभर लसूण – १ तुकडा लिंबाचा रस – १ टीस्पून बीपी कंट्रोल ड्रिंक रेसिपी धणे आणि वेलची रात्रभर पाण्यात भिजत ठेवा. नंतर पॅनमध्ये थोडे पाणी घ्या. आता कढईत सर्व काही टाका आणि उकळा. ते गाळून त्यात लिंबाचा रस घाला. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही त्यात मधही घालू शकता. ते सकाळी रिकाम्या पोटी गरम करून प्या.रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी करा हे नैसर्गिक उपाय मिठाचे सेवन कमी करा जास्त मीठ खाल्ल्याने तुमच्या शरीरात सोडियमचे प्रमाण वाढते. जर तुम्हाला उच्च रक्तदाबाची समस्या असेल तर तुम्ही जेवणात मिठाचे सेवन कमी करा.नियमित व्यायाम करा अनेक अभ्यासातून असे समोर आले आहे की प्रत्येक व्यक्तीने निरोगी राहण्यासाठी ३० ते ४५ मिनिटे नियमित व्यायाम केला पाहिजे. उच्च रक्तदाबाच्या समस्येने ग्रस्त असलेल्या सर्व लोकांसाठी व्यायाम करणे खूप महत्वाचे आहे.

# 'या' जीवनसत्त्वांच्या कमतरतेमुळे दूरदृष्टी होऊ शकते कमजोर, जाणून घ्या

अनेकांना कमी वयातच हृदयविकार, मधुमेहासारिख्या आजारांचा सामना करावा लागत आहे. हल्ली तरुण किंवा लहान मुलांमध्ये दृष्टी कमी होणं ही एक सामान्य समस्या बनली आहे. खराब जीवनशैली, जास्त टीव्ही पाहणं किंवा मोबाईल वापरणं ही त्याची प्रमुख कारणं असल्याचं मानलं जातं डोळ्यांच्या आरोग्याचा विचार केला तर त्यात जीवनसत्त्वे महत्त्वाची भूमिका बजावतात. अशा परिस्थितीत आज आपण जाणून घेणार आहोत की ते कोणते व्हिटॅमिन आहेत ज्यांच्या कमतरतेमुळे दृष्टी कमजोर होते.या जीवनसत्त्वांच्या कमतरतेमुळे दूरदृष्टी होऊ शकते कमजोर डोळ्यांच्या आरोग्यासाठी व्हिटॅमिन ए आवश्यक आहे. जर तुम्ही तरुण असाल आणि तुम्हाला



दिसत नसेल तर त्यामागचे सर्वात मोठे कारण म्हणजे व्हिटॅमिन ए ची कमतरता. व्हिटॅमिन ए च्या कमतरतेमुळे कॉर्निया जास्त कोरडा होतो. यामुळे तुमच्या डोळ्यात जळजळ होते. व्हिटॅमिन ए पुरेशा प्रमाणात मिळवण्यासाठी तुम्ही गाजर, पालक, पपई, लाल शिमला मिरची यांचा समावेश करू शकता. व्हिटॅमिन ए असलेल्या गोष्टींचा आहारात समावेश करा. जर तुम्ही पौष्टिक अन्नाचे सेवन केले नाही तर व्हिटॅमिन ए ची कमतरता होऊ शकते.ही लक्षणं दिसत असतील तर समजा की तुमची नजर होतेय कमजोर डोळ्यांना खाज येणे लॅपटॉपवर जास्त वेळ काम केल्याने डोळ्यांवर ताण येऊ लागतो. अशा स्थितीत डोळ्यांना खाज सुटू लागते.सकाळी उठल्यावर अस्पष्ट दिसणे सकाळी उठल्यावर काही तासांसाठी अस्पष्ट दिसू शकते. अशा वेळी तुम्ही कितीही वेळा डोळे धुवा पण तरीही तुम्ही पूर्णपणे स्पष्टपणे पाहू शकत नाही.

# ॲसिडिटीचा त्रास होतोय? मग करून पाहा 'हे' घरगुती उपाय..

ॲसिडिटी दूर करण्यासाठी ३ बेस्ट घरगुती उपाय..मसाल्यांमुळे भारतीय खाद्य जगभर प्रसिद्ध आहे. हे असे मसाले आहेत जे अन्नाला रुचकर बनवतात. पण हे केवळ चवीपुरते मर्यादित नसून त्याचा आरोग्यालाही फायदा होऊ शकतो. आपल्या स्वयंपाकघरात असे अनेक मसाले आहेत जे औषधासारखे काम करतात. स्वयंपाकघरात एकच नाही तर असे अनेक मसाले आहेत जे सिडिटी आणि गॅसची समस्या दूर करू शकतात. जाणून घेऊया अशा मसाल्यांविषयी जे सिडिटीच्या समस्येपासून आराम देऊ शकतात. सिडिटीच्या समस्येवर मात करण्यासाठी तुम्ही ओव्याचे सेवन करू शकता. त्यात थायमॉल नावाचे संयुग असते.असे करा सेवन एक चमचा ओवा रात्रभर पाण्यात भिजत ठेवा. पाणी गाळून दुसऱ्या दिवशी सकाळी प्या.

याशिवाय तुम्ही ओवा चघळूनही खाऊ शकता.तुम्ही ओव्याचा चहा तयार करून पिऊ शकता. एक ग्लास पाण्यात एक चमचा ओवा टाका आणि त्याला उकळून प्या.ॲसिडिटीचा त्रास होतोय? मग करून पाहा 'हे' घरगुती उपाय.. तुम्ही जिऱ्याचेही सेवन करू शकता. हे सिड न्यूट्रलायझर म्हणून कार्य करते जे पचनास मदत करते आणि सिडिटी दूर करते. जिऱ्यामध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट असतात जे चयापचय वाढवते आणि पचन सुधारते. एक ग्लास पाण्यात जिरे रात्रभर भिजत ठेवा. पाणी गाळून दुसऱ्या दिवशी सकाळी प्या. भाजलेल्या जिऱ्याचे पाण्यासोबत सेवन केल्यानेही सिडिटीपासून आराम मिळतो.बडीशेप बडीशेप खाल्ल्यानेही फायदा होऊ शकतो. बडीशेपमध्ये भरपूर फायबर असते. ते पचन सुधारण्यासाठी खूप उपयुक्त आहे. तुम्ही बडीशेपचा चहा पिऊ शकता. हे करण्यासाठी, एक कप पाणी गरम करा आणि त्यात एक चमचा बडीशेप घाला आणि उकळवा.



आणि नंतर ते प्या. यामुळे सिडिटी आणि ब्लोटिंगपासून आराम मिळतो.

# महती मनाची

'मन एव मनुष्याणाम्' असे म्हटले जाते कारण मनुष्याला असलेले मन ही त्याची विशेषता आहे. दगड, कीडा–मुंगीपासून ते झाडा–झुडपात मनोभाव असला तरी मनुष्य म्हणण्याइतपत मनाची उत्क्रांती फक्त माणसातच झालेली दिसते. मोड फुटल्यानंतर बीजाचे रूपांतर रोपटे, लहान झाड, वृक्ष, फळा–फुलांनी लगडलेला वृक्ष वगैरेत होते.या रूपांतर प्रक्रियेमुळे एका बीजापासून लाखो बिया तयार होऊ शकतील अशी संख्यात्मक उत्क्रांती होत राहतेच पण त्याचबरोबर झाडावरच्या फुलांचे सौंदर्य व सुगंध, फळांचा स्वाद व रंग नेहमीच आकर्षक असतो. 'देता एक कराने, किती घेशील दो करांनी' या उक्तीनुसार निसर्ग नेहमीच हजार हातांनी परत करत असतो व त्यातूनच उत्पन्नाचा आनंदही मिळतो.ही निसर्गाची उत्क्रांतीची प्रक्रिया आहे किंवा हा निसर्गाचा मूळ स्वभावच आहे. म्हणूनच शारीरिक वा भौतिक पातळीवरच्या उत्क्रांती प्रक्रियेत मनुष्य शरीर तयार होऊ शकले. मनुष्यशरीरात असणारा सारांश म्हणजेच मनोभाव. फुलाचा जसा वास तसा शरीरात असलेल्या मनाचा वास. मनः शक्तीमुळे घडणारी सर्व कार्ये ही उत्क्रांतीची परिसीमा होय. चित्रकाराने काढलेल्या चित्रामुळे आपले दुःख विसरून नवीन भरारी आलेली एखादी व्यक्ती किंवा एखाद्या गायकाचे संगीत ऐकून जीवनाची दिशा सापडलेली एखादी व्यक्ती चित्राच्या भौतिकतेपलीकडील भावशक्तीनेच प्रभावित होते.उत्क्रांती होत होत मनुष्य तर तयार होतो पण जो या मनावर मेहनत घेतो, त्याला मनाच्या सूक्ष्मत्वाकडून परमशक्तीकडे जाण्याचा मार्ग सापडतो. वस्तुमात्रातून कणाकडे, कणातून अणुकडे व अणुतून परमाणूकडे जसजशी वाटचाल होईल तसतशी शक्ती अधिकाधिक प्रकट होते त्याचप्रमाणे शरीरापेक्षा मनाची शक्ती मोठी असते.खरे तर शरीराने केलेली कामे शरीराने केली असे वाटले तरी खरे पाहता ती मनाच्या शक्तीमुळेच झालेली असतात. मनाची प्रेरणा नसेल तर प्रत्येक गोष्ट खूप अवघड वाटेल व कार्य सिद्ध होणार नाही. त्याच मनाला व्यवस्थित शक्ती मिळाली व त्याने एकदा निर्णय घेतला तर कुठलेही कार्य करणे अवघड नाही. मनोरथ पूर्ण व्हावे अशी इच्छा असणाऱ्यांना मनाच्या शक्तीद्वारे स्वतःचे सर्व मनोरथ पूर्ण करून घेता येऊ शकतात.रथ जमिनीवर चालतो व त्याचा प्रवास अखंडित असतो या दृष्टिकोनातून इच्छा एखाद्या भौतिक प्राप्तीसाठी असली तरी त्यापासून मिळणारे समाधान मनुष्याला पुढे जाण्यासाठी उद्युक्त करते. आरोग्य, समृद्धी, शांतीची अपेक्षा असणाऱ्यांनी बाह्य वस्तूंकडे पाहण्यापेक्षा स्वतःच्या मनाकडून आरोग्य प्राप्त होईल याकडे लक्ष दिले तर ते अधिक सोयीचे व खात्रीशीर ठरेल. आहाराने, औषधांनी सर्व रोग बरे होत असते तर मुळात मनुष्य आजारीच पडला नसता. म्हणूनच आजारपणाचे कारण मनोव्यथेत असते असे आयुर्वेदाने सांगितले आहे.आजारपणाचे कारण मनोव्यथेत असेल तर त्याचा इलाज सुद्धा मनाद्वारे नक्कीच करता येऊ शकेल. पैसा–अडका, समृद्धी, श्रीमंती ही सुद्धा मनाद्वारेच मिळते. मनात आळस भरलेला असेल



तर मनुष्याला काम करावेसे वाटणार नाही. अशा वेळी शारीरिक स्वास्थ्य ठीक असले तरी मनाची साथ नसल्यामुळे वेळ आळसात घालवला तर श्रीमंती वा समृद्धी कधीच मिळणार नाही.'मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धींचे कारण' असे तुकाराम महाराजांनी सांगितले ते काही उगाच नव्हे. आज जगात दिसत असलेले सर्व शोधही त्या त्या वैज्ञानिकाच्या मनाच्या स्फुरणातूनच लागलेले असतात. अगदी भौतिकाची प्रगतीसुद्धा मनाच्या इच्छेमुळेच झालेली असते. अशी आहे मनाची ताकद. या मनाला एकाग्र करण्यासाठी उपयोगी पडते ध्यान व मंत्र. मनाचा एकमेव आधार व आहे मनाचा तारणहार आहे मंत्र. छोटी छोटी शकले होऊन अनेक दिशात मनोतरंग पांगण्यापासून मनाला वाचविण्याचे काम मंत्र करतो म्हणून मंत्र मनाचा तारणहार आहे. 'मननात् त्रायते इति मन्त्रः' मनाला वेसण घालण्याचे काम 'राम नाम' करू शकते अन्यथा मन मोकाट सुटलेल्या जनावराप्रमाणे धावत सुटते. 'सोम' अर्थात 'संतुलन ॐ मेडिटेशन' या पद्धतीने मनावर उत्तम काम करता येते.समर्थ रामदासांनी मनाला उपदेश केला आहे 'प्रभाते मनी राम चिंतीत जावा'. मनाची परमावस्था म्हणजे अत्यंत सूक्ष्म मन. जसजसे ते सूक्ष्म होत जाईल तसतसे ते व्यापक व महान शक्तिशाली होऊन 'हे विश्र्वचि माझे घर' याची जाणीव करून देईल व मनाला परमशांती व परमशक्तीचा लाभ होईल.मनोविकारांमुळे शारीरिक विकार उत्पन्न होतात व त्यातून भीती व अशाश्र्वतता निर्माण होते. त्यातून पुढे मन अधिकच व्यथित होऊन छिन्नभिन्न होते. आजारपणात एखाद्या प्रिय व्यक्तीने, वडिलधाऱ्याने वा वैद्यांनी भेटून दिलेला धीर म्हणजे मनाला उपचारच असतो. मनाला एकत्र आणून खात्री मिळू शकली तर रोगावर विजय मिळविणे सोपे होते. आपण आता मरणारच, आपल्याला वाचविणारा कोणीच नाही, रोग आता आपल्याला संपवणार अशा कल्पना मनात रुजल्यास औषधे व उपचार लागू पडणे कठीण होते. पाण्यात दगड टाकल्यामुळे तयार होणाऱ्या लाटा काही वेळानंतर आपसूक शांत होतात, फक्त गरज असते ती पुन्हा पाण्यात दगड न टाकण्याची. तेव्हा प्रत्येक व्यक्तीने आजारपणात मनाची उभारी ठेवणे खूप गरजेचे असते.त्यासाठी उपयोगी पडते श्रद्धा व प्रार्थना. औषधोपचाराव्यतिरिक्त होणारे शुभेच्छा वगैरे इलाज श्रद्धेतून जन्माला येतात. श्रद्धेमुळे मनःशक्ती वाढून रोगाशी सामना करण्याची क्षमता निर्माण होते. अर्थात जगण्यासाठी काहीतरी कारण लागते. माझा काही उपयोग नाही असे समजण्यात किंवा स्वतःला सर्व व्यवहार करता येतात या नावाखाली घरातील मंडळींनी आता तुमची गरज नाही अशी वडिलधाऱ्यांची समज करून देण्यात जीवेष्णा कमी होऊ लगली तर मन रोग उत्पन्न करेल यात काही नवल नाही.प्रत्येक व्यक्तीने स्वतःचा म्हणून काही छंद, मित्रमंडळी, अभ्यास, नित्यकर्म चालू ठेवणे गरजेचे असते. त्याही पलीकडे जाऊन असे म्हणता येईल की दुसऱ्याच्या उपयोगी पडण्यासाठी मला काहीतरी करावेच लागेल कारण दुसऱ्याच्या हास्यात मिळणाऱ्या आनंदाची अवीट गोडी चाखण्यासाठी मला जगायचे आहे असे मनाने ठरविले तर रोग होणार नाहीत व आरोग्य उत्तम राहील.

## बद्धकोष्ठतेपासून आराम मिळवण्यासाठी सकाळी रिकाम्या पोटी ही पाने चावा, लवकरच मिळेल आराम




प्रत्येकाच्या स्वयंपाकघरामध्ये कढीपत्ता अगदी सहजासहजी आढळतो. कढीपत्त्याच्या फोडणीमुळे डाळी तसंच भाज्यांची चव अधिक रूचकर होते. पण आरोग्यासाठी त्याचे अनेक फायदे देखील आहेत. वजन कमी करणे आणि हृदयाच्या आरोग्याला चालना देण्यापासून ते सकाळी जाणवणारा थकवा आणि जंतूच्या संसर्गाशी लढा देण्यापर्यंत त्याच्या फायद्यांची यादी मोठी आहे.

पण हे पोटासाठी किती चांगले आहे हे तुम्हाला माहिती आहे का? होय, यामध्ये अनेक पोषक घटक असतात जे तुमची पचनशक्ती सुधारू शकतात आणि तुम्हाला सिडिटी आणि बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून आराम देतात. जर तुम्हालाही बद्धकोष्ठतेचा त्रास होत असेल तर रिकाम्या पोटी हे पान चावून खाल्ल्याने फायदा होऊ शकतो.कढीपत्ता बद्धकोष्ठतेसाठी चांगला आहे का?बद्धकोष्ठतेचा जवळपास सर्वच वयोगटातील लोकांना सामना करावा लागतो. बदलती जीवनपद्धती, चुकीच्या जेवणाच्या सवयी, सकस आहाराचा अभाव, व्यायामाचा अभाव आदी विविध कारणांमुळे बद्धकोष्ठतेचा त्रास सहन करावा लागत असतो. अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या आहारात कढीपत्त्याचा समावेश करू शकता. कढीपत्त्यात लेक्सेटीव्ह प्रॉपर्टीज असतात आणि त्यात काही डाइजेस्टिव एन्झाईम्स देखील असतात ज्यामुळे आतड्यांची हालचाल वाढते.यामध्ये फायबर देखील असते जे पचनक्रिया सुधारते. या व्यतिरिक्त या पानात कार्मिनेटिव गुणधर्म असतात जे बद्धकोष्ठता दूर करण्यासाठी खूप उपयुक्त मानले जातात. कढीपत्त्याचा थंड प्रभाव असतो ज्यामुळे पोट थंड होते आणि जळजळ आणि पेटके यापासून आराम मिळतो.

# लातूर पोलीसांची कारवाई, स्वतः चे फायदे साठी देहविक्रय करून घेणाऱ्या सात जणांना अटक. नऊ पीडित महिलांची सुटका

लातूर :- लातूर पोलीसांची कारवाई, स्वतः चे फायदे साठी देहविक्रय करून घेणाऱ्या सात जणांना अटक. नऊ पीडित महिलांची सुटका* या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, लातूर शहरातील रामरहिम नगर भागात व उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील देगलूर रोड भागात काही महिला व पुरुष स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बाहेरून स्त्रियांना बोलावून घेऊन त्यांच्याकडून देहविक्रीचा व्यवसाय करून घेत आहे. सदर माहितीची खातरजमा केल्यानंतर सदरची बाब खरी असल्याचे निर्दशनास येताच दिनांक १५/०२/२०२४ रोजी पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे ,अप्पर पोलीस अधीक्षक श्री.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात व नेतृत्वात एएचटीयु पथक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर व उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे यांचे पोलीस अधिकारी व महिला अमलदार यांचे पथकाने बनावट ग्राहक पाठवून मिळालेल्या माहितीची सत्यता पडताळून ती खरी असल्याचे निदर्शनास येताच लातूर व उदगीर मध्ये एकाच वेळी छापा मारण्यात आला.

दोन्ही ठिकाणी देहविक्री करीत असताना एकूण ९ पिडीत महिला व वेश्या व्यवसाय करून घेणारे ७ महिला व एक पुरुष आढळून आले.

तसेच पिडीत महिलांकडून देहविक्रय व्यवसाय करून घेणारे, स्वतःच्या फायद्यासाठी बाहेर गावाच्या महिलांना स्वतःचे घरात ठेवून त्यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेतात व आम्हाला काही रक्कम देऊन आमची राहण्याची खाण्यापिण्याची व्यवस्था करतात असे पीडित महिलांनी सांगितले.

सदर प्रकारा बाबत पोलीस पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा रजिस्टर नंबर १२५/२०२४ कलम ३, ४, ५, ७ अनैतिक व्यवसाय प्रतिबंध अधिनियम १९५६ व सहकलम ३७० , ३४ भा.द.वि. तसेच पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे गुन्हा रजिस्टर नंबर ९३/२०२४ कलम ३, ४, ५, ७अनैतिक व्यवसाय प्रतिबंध अधिनियम १९५६ व सहकलम ३७० , ३४ भा.द.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून कुंटणखाना चालणाऱ्या महिला व पुरुषांना अटक करण्यात आली आहे.

गुन्ह्याचा पुढील तपास पोली ठाणे एमआयडीसी व उदगीर ग्रामीण चे पोलिस अधिकारी व अंमलदार करीत आहेत.

## मनपा करणार १०३ कोटी १० लाखांची वसुली

लातूर : प्रतिनिधी -लातूर शहर महानगरपालिका हद्दीत ९९ हजारांहून अधिक मालमाा धारकांची संख्या आहे. त्यांच्याकडे एकुण १०३ कोटी १० लाख २५ हजार ३५८ रुपये मालमत्ता कराची थकबाकी आहे. ही थकबाकी वसुल करण्याकरीता महानगरपालिकेने वसुली मोहीम सुरु केली आहे. ५१ कोटी ६० लाख ७ हजार ४६ रुपये चालू थकबाकी वसुल करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांतर्गत पथके तैनात करण्यात आली आहेत.मालमत्ता कराची १०३ कोटी १० लाख २५ हजार ३५८ रुपयांची एकुण थकबाकी आहे. त्यात ५१ कोटी ६० लाख ७ हजार ४६ रुपये चालू थकबाकी आहे. थकीत मालमत्ता कर वसूल करण्यासाठी नोटीसा देऊन उपयोग होत नसल्याने लातूर शहर महानगरपालिका प्रशासनाने जप्तीची मोहीम सुरु केली आहे. या अंतर्गत कर न भरणा-या मालमत्ता महानगरपालिकेकडून सील केल्या जात आहेत. जप्तीची कारवाई केली जात आहे. जप्तीची कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी कर भरुन सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.महानगरपालिकेने मालमत्ता कराच्या वसुलीसाठी जाचक मोहीम सुरु केली आहे. ती तत्काळ थांबविण्यात यावी, मालमत्ता कराच्या व्याजात सूट देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) वतीने करण्यात आली आहे. मालमत्ता व पाणीपट्टीच्या करापेक्षा व्याजाची रक्कम जास्त आहे. त्यामुळे भरणा होत नाही. व्याज माफ करण्यात यावे, असे आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## पेटीएम बँकेला फास्टॅग सेवेतून वगळले

नवी दिल्ली : पेटीएम पेमेंट्स बँकेवर रिझर्व्ह बँकेने कारवाई केल्यानंतर आता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मोठा निर्णय घेतला असून महामार्गावर टोल भरण्यासाठी वापरण्यात येणा-या फास्टॅग सेवेतून पेटीएमला वगळण्याचा निर्णय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने घेतला आहे. पेटीएम बँकेच्या ऐवजी आता त्या ठिकाणी इतर ९ बँकांसोबत करार करण्यात येणार आहे.पेटीएम पेमेंट बँकेला फास्टॅग सेवेतून वगळण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणने ९ बँकांशी हातमिळवणी केली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) पेमेंट्स बँकेला १५ मार्चनंतर ठेवी घेण्यास बंदी घातली आहे. त्यामुळे एनएचएआयला ही व्यवस्था करावी लागली आहे. पेटीएम पेमेंट्स बँक देशभरातील २४७ टोल प्लाझाच्या टोल संकलनाचे व्यवस्थापन करते. ती या टोल प्लाझासाठी अ‍ॅक्वायर बँक म्हणून काम करते.पेमेंट बँकेचे देशातील २४७ टोल प्लाझावर काम एनएचएआय म्हणजेच भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणने सांगितले की इतर ९ बँका पेटीएम पेमेंट्स बँकेची जागा घेतील. या बँकांद्वारे सर्व २४७ टोल प्लाझावर पेमेंट केले जाऊ शकते. आरबीआयच्या निर्णयामुळे वन ९७ कम्यूनिकेशनची उपकंपनी असलेली पेमेंट बँकर वगळण्यात आली आहे. पेटीएम पेमेंट्सद्वारे चालवल्या जाणा-या या २४७ टोल प्लाझांचा दैनंदिन टोल संकलनात १९० कोटी रुपयांचा वाटा आहे. एकूण टोलवसुलीच्या हे प्रमाण १४ टक्के आहे.या बँकांना अधिग्रहण बँका बनविण्यात आल्या पेटीएम पेमेंट्स बँकेऐवजी एनएचएआयच्या भारतीय महामार्ग व्यवस्थापन कंपनीने अ‍ॅक्सीस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, आयडीबीआय बँक, आयडीएफसी फर्स्ट बँक आणि कोटक महिंद्रा बँकेची निवड केली आहे. हे सर्वजण टोल सेवेचा व्यवसाय सांभाळतील. ते सर्व अ‍ॅक्वायर बँक म्हणून काम करतील.

## आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते कृष्णा मोहिते पडद्याआड




मुंबई :- आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते, मौजे काजूर्ली, ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरीचे सुपुत्र, बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ७७७ विरार या शाखेचे माजी चिटणीस व संघटक, शाखा क्र. ३६२ बेस्ट वसाहत सांताक्रूझचे चिटणीस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच, काजूर्लीचे माजी अध्यक्ष, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमचे (बेस्ट) सेवानिवृत्त अधिकारी कृष्णा गंगाराम मोहिते यांचे नुकतेच वयाच्या ७६ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. दिवंगत कृष्णा गंगाराम मोहिते हे प्रेमळ, सुस्वभावी, मनमिळाऊ होते, तसेच आंबेडकरी चळवळीतील ध्येयवादी व धडाडीचे कार्यकर्ते होते, त्यांनी आपल संपूर्ण जीवन आंबेडकरी चळवळीकरता वाहून दिले होते, त्यांच्या अंत्ययात्रेत समाजातील सर्वच थरातील लोक तसेच सर्वच पक्षीय राजकारणी उपस्थित होते, त्यांच्या अचानक जाण्याने समाजात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्यामागे त्यांची सुविद्य धर्मपत्नी सरिता कृष्णा मोहिते, तीन मुले, दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दिवंगत कृष्णा गंगाराम मोहिते यांच्या पुण्यानुमोदन व शोकसभेचा कार्यक्रम रविवार दि. १८ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता ९ए/५, सेन्ट्रल पार्क को.ऑप.हौ.सोसायटी, आगाशी रोड, विरार या त्यांच्या राहत्या घरी बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ७७७ चे अध्यक्ष विजय सुकडोजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली तसेच बौद्धाचार्य हेमंत वसंत सावंत (भारतीय बौद्ध महासभा) यांच्या धम्मसंस्कार विधी अधिपत्याखाली होणार आहे तरी सर्वांनी उपस्थित राहून आदर्शांस श्रद्धांजली अर्पण करावी अशी विनंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच काजूर्ली शाखेच्या वतीने काढण्यात आलेल्या परिपत्रकात करण्यात आली आहे.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे जेईई मेन्स परीक्षेत नेत्रदीपक यश बस्वदीप बेंबरेला ९५.७३ पंर्सेटाइल गुण प्राप्त



लातूर :- नॅशनल टेस्टिंग एजन्सी तर्फे पहिल्या टप्प्यात घेण्यात आलेल्या जेईई मेन परीक्षेचा निकाल नुकताच प्रसिद्ध झाला असून या परीक्षेत महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी बस्वदीप रवींद्र बेंबरे याने ९५.७३ परसेंटाइल गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. त्याबद्दल श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकर अप्पा बिडवे यांच्या हस्ते बसवदीप बेंबरे व पालक प्रकाश बेंबरे यांचा शाल, स्मृती चिन्ह व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादीवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, प्रा. धोंडीबा भुरे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. विश्वनाथ स्वामी, डॉ. टि. घनश्याम, प्रा. व्यंकट दुडिले आणि प्रा. माधुरी सरपे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शुभेच्छा देताना संस्थेचे अध्यक्ष शिवशंकर अप्पा बिडवे म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात शिकणारा विद्यार्थी हा ग्रामीण भागातील असून तो गरीब, गरजू आणि होतकरू कुटुंबातील असतो. अनेकदा त्याला गुण कमी असतात परंतु आपल्या महाविद्यालयांमध्ये प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, समन्वयक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाकडे अधिक लक्ष देतात त्यामुळे विद्यार्थी नेत्रदीपक यश संपादन करतात यासाठी संस्था पदाधिकारी मौलिक मार्गदर्शन करतात. याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करून गुणवंत विद्यार्थी विश्वदीप बेंबरे याला पुढील वाटचालीसाठी खूप खूप हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादीवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, प्रा. माधुरी सरपे, आणि प्रकाश बेंबरे यांनी अभिनंदन करून कौतुक केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रा. धोंडीबा भुरे यांनी मानले.

## आज झुलणार शिवबांचा पाळणा नेत्रदीपक सोहळा



लातूर : प्रतिनिधी येथील छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने प्रथमच शिवजन्मोत्सवाचा नेत्रदीपक सोहळा छत्रपती शिवाजी महाराज चौकात १८ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री साजरा करण्यात येणार असून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते बाल शिवबांचा पाळणा झुलवून त्यास प्रारंभ होणार आहे. यावेळी, वीर पत्नी मुद्रिका प्रकाश कांबळे यांच्यासह महिला अधिकारी - कर्मचा-यासह महिला विद्यार्थीनी व शिवप्रेमींची उपस्थिती राहणार आहे.यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच पुतळा परिसर भगव्या पताका व विद्यूत रोषणाईने सजवला जात आहे. पुतळ्याचे कठडे व आतील भागात फुलांची आकर्षक सजावट करण्यात येणार आहे. रात्री ९ वाजता डॉ. निशिगंधा साळुंके यांचा आम्ही जिजाऊंच्या लेकी हा शिव गितांचा कार्यक्रम होणार आहे. शिवरायांच्या पुतळ्यासमोर सजवलेला पाळणा राहणार असून त्यात बाल शिवबांची मूर्ती असेल. रात्री बारा वाजले की तुता-यांचा निनाद , फुलांची उधळण व फटाक्यांची आतिषबाजी केली जाईल. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे , वीर पत्नी मुद्रिका प्रकाश कांबळे यांच्या हस्ते बाल शिवबांचा पाळणा झुलवला जाईल व पाळणे गाईले जातील. यावेळी वीर माता, वीर पत्नी यांच्यासह विविध विभाग व क्षेत्रातील महिला अधिकारी-कर्मचारी विद्यार्थीनींची उपस्थिती असेल.

## नांदेडला जाण्यासाठी किनवट रेल्वे स्टेशनवर सकाळी ८ वाजता आलेल्या प्रवाशांना पाच तास ताटकळत बसावे लागले.

### 'कृष्णा'मुळे इंटरसिटी रेल्वे रद्द







किनवट.ता.प्रतिनिधी.(शेख शौकत) दररोज उशिराच धावणारी तिरुपती-आदिलाबाद ही कृष्णा एक्स्प्रेस १६ फेब्रुवारी रोजी तब्बल आठ तास उशिराने किनवटला पोहोचली. त्यामुळे या रेल्वेवर अवलंबून असलेली आदिलाबाद-नांदेड ही इंटरसिटी एक्स्प्रेस चक्क रद्द करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढवली. त्यामुळे प्रवाशांची मात्र ऐनवेळी चांगलीच गैरसोय झाली. तिरुपती-आदिलाबाद कृष्णा एक्स्प्रेस अधून-मधून उशिराने धावत आहे. १६ फेब्रुवारी रोजी, तर ही रेल्वे सकाळी ५:०९ वाजता किनवट येथे येणे अपेक्षित होते. मात्र, १६ फेब्रुवारी प्रतीक्षालयाला कुलूपच ! रेल्वे गाड्या विलंबाने धावत आहेत. त्यातच किनवट रेल्वेस्थानकावरील प्रतीक्षालय कक्ष कुलूपबंद आहे. त्यामुळे अनेक प्रवाशांना प्लॅटफॉर्मवर थांबूनच रेल्वेची प्रतीक्षा करावी लागली. नांदेड-आदिलाबाद मार्गावरील किनवट रेल्वे स्टेशन हे सर्वाधिक उत्पन्न देणारे रेल्वे स्टेशन आहे. अशा या रेल्वेस्थानकावर समस्याच समस्या आहेत. रेल्वे प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. मात्र, या गाडीने नांदेडला जाण्यासाठी रोजी ही रेल्वे किनवट येथे १२:५६ वाजता आली. कृष्णा एक्स्प्रेसने तिरुपती ते किनवट या प्रवासासाठी २४ तास लागतात. आज या गाडीला ३२ तास लागले. या गाडीला विलंब झाल्याने कृष्णा एक्स्प्रेसवर विसंबून असलेली इंटरसिटी रद्द करण्याची वेळ आली. किनवट रेल्वेस्टेशनवर सकाळी ८ वाजता आलेल्या प्रवाशांना पाच तास ताटकळत बसावे लागले. नांदेडला जाण्यासाठी किनवट रेल्वेस्थानकावर आलेल्या प्रवाशांना अखेर नंदिग्राम एक्स्प्रेसने नांदेडला जावे लागले.

# सुप्रसिद्ध गायक महेश काळे यांच्या स्वरवर्षावात लातूरकर चिंब!

लातूर : प्रतिनिधी राज्य शासनाचा पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित महासंस्कृती महोत्सवाचा समारोपीय कार्यक्रम गुरुवारी दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावरील कै. नटवर्य श्रीराम गोजमगुंडे रंगमंच येथे पार पडला. सुप्रसिद्ध गायक महेश काळे यांच्या 'सूर निरागस हो' या कार्यक्रमाने महोत्सवाचा समारोप झाला. यावेळी त्यांनी सादर केलेल्या एकाहून एक सरस आणि अवीट गीतांच्या स्वरधारांमध्ये लातूरकरचिंब भिजून गेले. यावेळी सादर झालेल्या बहारदार गीतांमुळे आणि त्याला मिळालेल्या तितक्याच दमदार प्रतिसादामुळे समारोपीय सोहळा संस्मरणीय ठरला.पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हा प्रशासनाचा महासंस्कृती महोत्सव आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित विभागीय १०० वे नाट्य संमेलनाच्या निमित्ताने लातूर जिल्ह्यातील रसिकांना पाच दिवसाची सांस्कृतिक मेजवानी मिळाली. यानिमित्ताने विविध दर्जेदार कार्यक्रम लातूरकरांना पाहायला मिळाले. या उपक्रमाचा समारोपही तितकाच दर्जेदार आणि संस्मरणीय झाला. महेश काळे यांचे स्वर कानात साठविण्यासाठी मोठ्या संख्येने जमलेल्या लातूरकरांसाठी आजचा दिवस पर्वणी ठरला. शास्त्रीय संगीतातील जवळपास १८ राग एकत्र गुंफलेल्या रागमालेने महेश काळे यांनी कार्यक्रमाची सुरुवात केली. शास्त्रीय गायन, भक्तिगीते, नाट्य गीतांच्या माध्यमातून रंगलेल्या या स्वर मैफिलीमध्ये प्रेक्षकही तल्लीन होवून गेले. या प्रेक्षकांनाही आपल्या गायनात सहभागी करुन घेत महेश काळे यांनी संपूर्ण वातावरण संगीतमय केले.सूर निरागस हो, घेई छंद मकरंद, हे सुरांनो, चंद्र व्हा चांदण्याचे कोष माझ्या प्रियकराला पोचवा यासारखी एकाहून एक श्रवणीय गीते सादर करणा-या महेश काळे यांच्या प्रत्येक गीताला प्रेक्षकांनी भरभरुन दाद दिली. 'मोरयामोरया' या गाण्यामध्ये प्रेक्षकांना सहभागी करुन घेत महेश काळे यांनी सर्वांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. महेश काळेंच्या सुरात सूर मिसळत प्रेक्षकांनीही या कार्यक्रमांची रंगत वाढविली. कार्यक्रमाच्या शेवटी सादर झालेल्या 'कानडा राजा पंढरीचा' या अभंगाप्रसंगी उपस्थितांनी टाळ्याच्या गजरात विठू नामाचा गजर करीत कार्यक्रमाचा समारोप केला. पाच दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रमांना लातूरकरांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल जिल्हा प्रशासनाच्या वतीने उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्यावतीने शैलेश गोजमगुंडे यांनी आभार मानले.

## कच्चा माल महागल्याने थंड पाण्याचा माठ खिशाला पोळतोय!

लातूर : प्रतिनिधी ग्रामीण भागात थंडी आता पूर्णपणे ओसरली असून उन्हाच्या झळा सगळीकडे चांगल्याच जाणवू लागल्या आहेत. उन्हाचा पारा चढण्यास सुरुवात झाली असून गरिबाचा फ्रीज म्हणून ओळखल्या जाणा-या माठाची मागणी वाढत आहे. कुंभार व्यवसायिकांच्या वर्षभर केलेल्या अपाट कष्टानंतर बनविण्यात आलेल्या माठांना उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणावर मागणी असते. शहरातील गुळ मार्केट चौकात ग्रामीण भागासह शहरातील कुभाराकडून माठ विक्रीसाठी दुकाने थाटली असून खरेदीचा जोर वाढत आहे. सध्या बाजारात गरिबांचा फ्रीज दाखल झाले आहे. माठांचा कच्चा माल महागल्याने थंड पाण्याचा माठ खिशाला पोळतो आहे.उन्हाच्या झळा वाढू लागल्यात्यामुळे नागरिकांना आता थंड पाण्याची आवश्यकता भासू लागली आहे. दरवर्षीप्रमाणे गरिबांचा फ्रिज म्हणून संबोधल्या जाणा-या माठाचे बाजारात आगमन झाले आहे. मात्र, माठासाठी लागणा-या कच्च्या मालाच्या किमतीत काही प्रमाणात वाढ झाल्याने यंदा माठाचे दर जवळपास २०० ते ४०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. शहरातील गुळ मार्केट भागात लहान-मोठ्या आकारातील लाल, काळ्या रंगाचे माठ, रांजण आणि नळ लावलेले माठ विक्रीसाठी दाखल झाले आहेत. त्यातच उन्हाचा कडाका वाढल्याने माठांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असून, नागरिकांतून चांगली मागणी आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE